नि.दि.दा. क्र. ३४/२०१५
श्रीधर वि. सुरेश
CNR No.MHWS080004512015

## निशाणी क्र. ३२ खाली आदेश
## (पारित दिनांक २१.०२.२०२३)

वादीच्या वकीलांनी सदरचा अर्ज प्रकरणात नव्याने मुद्दा काढण्यासाठी दाखल केला आहे. त्याच्या कथनानुसार, वादीने सदरचा दावा उदघोषणेकरिता व कायम मनाई हूकूम मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रकरणात न्यायालयाने मुद्दे स्थापीत केले असून वादी हा आदीवासी समाजाचा असल्याने कैफीयत पाहून वि. न्यायालयाने अतिरिक्त मुद्दा खालीलप्रमाणे स्थापीत केला आहे.

"Whether sale deed dated 20.02.2002 is hit by the provision of Schedule Tribe Act ?"

परंतु सदरचा अतिरिक्त मुद्दा नव्याने पुनर्स्थापीत करणे दाव्याच्या योग्य त्या न्यायनिर्णयासाठी गरजेचे असल्याचे सांगून खालीलप्रमाणे सदर मुद्दा पुनर्स्थापीत करण्याची विनंती केली.

"Whether sale deed dated 20.02.2002 is hit by the provision of Section 36-A of M.L.R. Code ?"

**०२** याउलट प्रतिवादीच्या वकीलांनी अर्जास विरोध दर्शवून सदरची बाब ही मागील मुद्दयात समाविष्ट असल्याने सदरचा अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

**०३** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर प्रकरण दिनांक ०८.०६.२०१५ रोजी नोंदणीकृत झाले असून प्रतिवादी हजर झाल्यानंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र. १६ खाली दिनांक ०३.०४.२०१९ रोजी मुद्दे स्थापीत केलेले आहेत. त्यानंतर प्रकरण वादीचे पुराव्याकरिता नेमलेले होते. वादीने दिनांक २१.०३.२०२२ रोजी नि.क्र. २६ खाली त्याच्या पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून वादीचा सरतपास व उलटतपास होणे बाकी आहे.

**०४** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी नि.क्र. १६ खाली एकूण चार मुद्दे काढलेले असून पहिला मुद्दा वादग्रस्त खरेदीखत हे कर्जाच्या सुरक्षेकरिता करुन दिले आहे काय ? असा मुद्दा काढला असून मुद्दा क्र. ०२ व ०३ हे वादी उदघोषणा व मनाईहुकूम मिळण्यास पात्र आहे काय ?, असे काढलेले असून चौथा मुद्दा आदेश काय?, असा काढलेला आहे. वादीच्या वकीलांनी नि. ३० वरील अर्ज केल्यावर दोन्ही पक्षांचे कथन ऐकून

सदर अर्ज दिनांक १५.११.२०२२ रोजी मंजुर करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने अतिरिक्त मुद्दा स्थापीत करण्यात आलेला आहे. त्यानंतर प्रतिवादीच्या वकीलांनी दिनांक १२.१२.२०२२ रोजी नि.क्र. ३१ नुसार अतिरिक्त मुद्दा काढण्याचा अर्ज दिनांक १२.०१.२०२३ रोजी मंजूर करण्यात येऊन प्रकरणात अतिरिक्त मुद्दा काढण्यात आला होता. त्यानंतर वादीच्या वकीलांनी सदर अर्ज दिनांक ०१.०२.२०२३ रोजी दाखल केलेला आहे.

<u>०५</u> अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दोन्ही पक्षांचे कथन ऐकुन वादीने दिनांक १५.११.२०२२ रोजी नि.क्र. ३० नुसार केलेला अतिरिक्त मुद्दा काढण्याचा अर्ज त्याच दिवशी मंजूर करण्यात येऊन प्रकरणात अतिरिक्त मुद्दा १–अ नुसार काढण्यात आला होता. वादीच्या नि.क्र. ०१ वरील वादपत्रामधील कैफियतचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पान क्र. ०३ वर ओळ क्र. ०२ व ०४ मध्ये सुध्दा वादी हा अनुसूचित जमातीचा असल्याबाबतचा उल्लेख नमूद असून प्रतिवादीने सुध्दा त्याच्या जबाब दाव्यामध्ये पान क्र. ०२ वर परिच्छेद क्र. ०३ मध्ये वादी हा अनुसुचित जमातीचा असल्याचा मजकूर नाकारला आहे.

<u>०६</u> परंतु माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी मूद्दे स्थापीत करतांना वादीने अर्जात कथन केलेला मुद्दा काढलेला दिसून येत नाही. जरी नि.क्र. ३० नुसार अतिरिक्त मुद्दा काढलेला असला तरी सदर मुद्दा कायद्याच्या अनुषंगाने योग्यरित्या पुनर्स्थापीत करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. दोन्ही पक्षांची कैफियत, दाव्याचे स्वरुप आणि खरेदीखताचा व्यवहार बघता प्रतिवादीने कथन केलेला सदर प्रस्तावीत मुद्दा हा दाव्याच्या मुळापर्यंत जाणारा असल्याने सदर मुद्दा पुनर्स्थापीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याचे स्वरुप आणि वादी प्रतिवादीमधील वाद बघता सदर मुद्दा महत्वाचा आणि दाव्याचा गुणदोषांवर परिणाम करणारा असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जाच्या अनुषंगाने नि.क्र. १६ खालील मुद्दा क्र. १–अ मध्ये दुरुस्ती करण्यात येत आहे.

३. दोन्ही पक्षांनी व वकीलांनी सदर बाबीची नोंद घ्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2023.02.21 17:49:20 +0530

( यो.द. कोईनकर)

दिनांकः २१.०२.२०२३ दिवाणी नयायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Rohit D. Pandit (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 21.02.2023 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 21.02.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 21.02.2023 |